असा. क्र. ६३ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, मार्च ३१, २००६/चैत्र १०, शके १९२८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ मार्च २००६

अधिसूचना

मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९.

क्रमांक बीपीए- २००६/सीआर-१/इएक्ससी-२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास असे वाटते की, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणावेत आणि म्हणून मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई पंचवीस) " (यात पुढे ज्याचा उक्त अधिनियम " असा निर्देश केलेला आहे) " च्या कलम १४३ च्या उप-कलम (३) च्या परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे हे नियम आधी प्रसिद्ध न करता ते करण्यात यावेत ;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम १४३ च्या उप-कलम (२) च्या खंड (ब) व (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालील नियम करीत आहे :—

१. या नियमांना मुंबई विदेशी मद्य (सुधारणा) नियम, २००६ असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मधील नियम २५ च्या उप नियम ४ खंड (डी) मधील,—

(१) उप खंड (१) ऐवजी पुढील उप खंड समाविष्ट करण्यात येत आहे :—

" (१) मागील ५ वर्षांच्या मद्य विक्रीपैकी पहिल्या वर्षाच्या मद्यविक्रीपेक्षा पुढील ४ वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांची मद्यविक्री कमी असली पाहिजे, किंवा मागील ५ वर्षांच्या मद्यविक्रीच्या वार्षिक सरासरी पेक्षा सदर ५ वर्षांपैकी कोणत्याही तीन वर्षांची मद्य विक्री कमी असली पाहिजे :

परंतु, सदर कालावधीसाठी अनुज्ञप्तीचे नूतनीकरण होऊन अनुज्ञप्ती वैध असली पाहिजे ; " ;

(२) उप खंड (५) च्या पहिल्या परंतुकानंतर खालीलप्रमाणे परंतुक अंतर्भूत करण्यात येत आहे :—

" परंतु उप नियम ४ चे खंड (डी) मधील उप खंड (१) व (२) यामध्ये नमूद केलेल्या शर्ती खालील परिस्थीतीत लागू होणार नाही. तथापि सदर परिस्थीतीतील स्थलांतर हे अनुज्ञप्ती ग्रामीण भागातील असल्यास त्याच ग्रामपंचायत क्षेत्रात आणि अनुज्ञप्ती नागरी भागात असल्यास त्याच वार्डात करण्यास मान्यता द्यावी :—

(अ) ज्या प्रकरणात अनुज्ञप्तीची जागा विकास योजना राबविताना जसे की रोड रुंदीकरण इत्यादीमुळे प्रभावित झाली असेल किंवा

(ब) ज्या प्रकरणात अनुज्ञप्त्या करारपत्र करून भाड्याच्या जागेत आहेत आणि त्यांच्या बाबतीत भाडेपट्टीच्या (करारपत्राचा) कालावधी संपल्यानंतर त्या जागेचा मालक ती जागा पुन्हा करारपत्राचे नुतनीकरण करून भाड्याने देण्यास तयार नसल्यास, किंवा

(क) ज्या प्रकरणात मा. न्यायालयाच्या आदेशामुळे अनुज्ञप्तीचे स्थलांतर आवश्यक असेल. ";

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

गो. जो. रसाळ,
शासनाचे उप सचिव.

# HOME DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 31st March 2006

*NOTIFICATION*

BOMBAY PROHIBITION ACT, 1949.

No. BPA. 2006/CR. 1/EXC. 2.—Whereas the Government of Maharashtra considers that the following rule further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Bombay Prohibition Act, 1949 (Bom. XXV of 1949), (hereinafter referred to as " the said Act ") ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (*b*) and (*k*) of sub-section (2) of section 143 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Foreign Liquor rules, 1953, as follows, namely :—

1. These rules may be called the Bombay Foreign Liquor (Amendment) Rules, 2006.

2. In rule 25, of the Bombay Foreign Liquor Rules, 1953 in sub-rule (*4*), in clause (*d*),—

(*a*) for sub-clause (*i*), the following sub-clause shall be substituted, namely :—

" (*i*) considering the sale of liquor of past five years, the sale of liquor of any two years of last four years shall be less than the sale of first year of this block of five years ; *or* considering the sale of liquor of past five years, the sale of liquor of any three years shall be less than that of the annual average sale of the liquor for the same five years :

Provided that, the licenced shop holds valid licence during the said period ; " ;

(*b*) in sub-clause (*v*), after the first proviso, the following proviso shall be added, namely :—

" Provided further that, the conditions as laid down in sub-clauses (*i*) and (*ii*) of clause (*d*) of sub-rule (*4*) shall not apply in respect of the following situations; however, under such situation shifting shall be

allowed within the area of same *Gram Panchayat* or same ward, as the case may be,—

(A) licencee whose premises are affected by the implementation of Development Scheme such as road widening, and the like ;

(B) in the case where the licencee is running his licenced shop at the place under the rental deed and the landlord or owner of the place do not agree to extend the rental deed ; or

(C) in the case where the shifting is essential due to Hon'ble Court's Order.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

G. J. RASAL,
Deputy Secretary to Government.